नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०१/२०२५ (रविवार) सकाळ

## ७६ वा प्रजासत्ताक दिनानिमीत्य नागपूर ग्रामीण पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांना सन्मानपत्र प्रदान

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताकदिनी उल्लेखनीय कामगिरीसाठी नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक श्री मनोज एस. चौधरी पोलीस ठाणे मौदा जिल्हा नागपूर ग्रामीण यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४ उत्कृष्ट तपासासाठी प्राप्त असुन त्याबाबतचे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. **नागपूर येथील कस्तुरचंद पार्क मैदानावर** झालेल्या ध्वजारोहण समारंभा दरम्यान सन्मानपत्र वितरण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला मा. विभागीय आयुक्त नागपूर श्रीमती विजयालक्ष्मी प्रसन्ना–बिदरी, नागपूर शहर येथील मा. पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल, मा. पोलीस सहआयुक्त निसार तांबोळी, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र नागपूर डॉ. श्री. दिलीप भुजबळ –पाटील, मा. जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर, नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांचेसह इतर वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तसेच मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी उल्लेखनीय कामगिरीसाठी नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील ०१ पोलीस अधिकारी व ०३ पोलीस अंमलदार यांना मा. पोलीस महासंचालक यांचे उत्कृष्ट कामगिरीसाठी पदक प्राप्त असुन त्याबाबतचे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. **सिव्हील लाईन येथील पोलीस भवन** येथे झालेल्या ध्वजारोहण समारंभा दरम्यान सन्मानपत्र वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यांमध्ये नागपूर ग्रामीण येथील १) पोलीस उपनिरीक्षक लोमेश ज्ञानेश्वर गायधने (सेवानिवृत्त) २) पोलीस हवालदार निलेश साहेबराव बर्वे नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा ३) पोलीस हवालदार श्री चांगदेव महागुजी कुथे नेमणूक पोलीस स्टेशन कुही ४) चालक पोलीस हवालदार विनोद कालिचरण कनोजिया नेमणूक पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी नाग्रा. यांना मा. पोलीस महासंचालक यांचे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला नागपूर शहर येथील मा. पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल, मा. पोलीस सहआयुक्त निसार तांबोळी, मा. अतिरीक्त पोलीस आयुक्त (दक्षिण) डॉ. शिवाजी राठोड, अतिरीक्त पोलीस आयुक्त (उत्तर) श्री. प्रमोदकुमार शेवाळे , नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार अधिकारी उपस्थित होते. मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी सन्मानपत्र मिळालेल्या अधिकारी आणि अंमलदार यांना पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा दिल्या.













पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर